ATP वर्ल्ड टूर २५० सिरीज अंतर्गत "महाराष्ट्र ओपन" टेनिस स्पर्धेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : पुमाप्र ३५१९/प्र.क्र.१०/क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २७ मार्च, २०१९.

वाचा-

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बैठक ३४१७ /प्र.क्र.८५/क्रीयुसे-२, दि.१५ जुलै, २०१७.

२) वित्त विभाग शासन परीपत्रक क्र. पूरक-२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३;दि.०८.०३.२०१९.

प्रस्तावना -

वर्ल्ड टूर २५० सिरिज या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यामानने "महाराष्ट्र ओपन" या नावाने आयोजित करण्यास दि.१५.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तसेच सदर स्पर्धा आयोजनासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय गठीत करण्यात आली होती.

सदर स्पर्धा दि.३१.१२.२०१८ ते ०५.०१.२०१९ या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे पार पडल्या असून सदर स्पर्धेतील बक्षिसावरील खर्च भागविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

दि. ३१.१२.२०१८ ते ०५.०१.२०१९ या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र ओपन या स्पर्धा आयोजनासाठी रु.१८०.०० लक्ष (रुपये एक कोटी ऐंशी लाख फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर देयक कोषागारात सादर करून रु.१८०.०० लक्ष (रुपये एक कोटी ऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन यांच्या नावाने काढून त्यांना तो पोचपावती घेऊन द्यावा.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्र. ०३, २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ (०२) क्रीडा स्पर्धा, (०२) (०३) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फ़त नोंदणीकृत क्रीडा संस्थांना सहाय्यक अनुदान (राज्य) (२२०४ १९४३), ३१ सहाय्यक अनुदाने" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदी मधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या दि.०८.०३.२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत. सदर परिपत्रकातील अटी व सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित उपसंचालक व लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२७१४५८५७२१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.27 15:04:55 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत).
७) सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत).
८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत)
९) वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे(क्रीडा संचालनालयामार्फत)
१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
११) उप सचिव (क्रीडा)/ अवर सचिव (क्रीयुसे २ व ३) / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शा.शि.व क्री.वि., मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती, क्रीयुसे-२.